# प्रकरण तिसरे

## वृध्द शेतक-यांची आर्थिक आवस्था


आर्थिक दारिद्र्य हे भारतीय शेतकरी समाजाचे वृध्दापकाळातील जीवन उध्दवस्त करणारे एक महत्वाचे कारण असल्याचे अभ्यासा मध्ये दिसून आले. वृध्दांच्या आर्थिक हालाखीचा कालखंड त्यांच्या वृध्द काळा पुरता मर्यादित करता येत नांही शेतक-यांच्या संपूर्ण जीवनामध्ये किंवा शेतकरी वृध्दांच्या पूर्वायुष्या मध्ये या दारिद्र्याची कारणीमिमांसा शोधावी लागते. शेती व्यवसाय आणि समाजातील इतर कांही घटक यांच्यातील दोषामुळे शेतकरी दारिद्र्य बनतात. कर्जाच्या कचाट्यात सापडतात. आणि त्याचे अगदी सर्वात गंभीर दुष्परिणाम शेतक-यांना वृध्दापकाळी भोगावे लागतात म्हणूनच वृध्द शेतक-यांच्या आर्थिक अवस्थेचा आढावा घेण्यासाठी संशोधनाने अभ्यास क्षेत्रातील शेती व्यवसाय त्या मध्ये होणारी आर्थिक पिळवणूक व त्याचा शेतक-यावर पर्यायाने शेतकरी वृध्द समाजावर होणारा परिणाम याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

### शेती हा किफायतशीर धंदा नव्हे -

भारतातील शेतक-यांची आर्थिक परिस्थिती समाधानकारक नांही हे सर्व मान्य सत्य आहे त्याची कारणे अनेक आहेत हा व्यवसाय

धंदा म्हणून केला जात नांही तो पिढयान पिढयांचा जिवन वृत्ती म्हणून स्वीकारली जाते नफ्या तोटयाचा हिशोब भारतीय शेतकरी करीत नांही इतर कोणताही व्यावसायीक आपला व्यवसाय पैसा मिळविण्यासाठी किंवा नफा मिळविण्यासाठी सुरू करतात आपले नफ्याचे उददीष्ट सफल होत नसेल तर ते आपले व्यावसाय बंद करतात भारतीय शेती करायचे कधी थांबवत नांहीत. नफ्या तोटयाचे गणीत त्यांच्या डोळ्यात नसते हंगामा प्रमाणे काम करीत राहणे एवढेच त्याला माहित असते. अभ्यासाठी गडहिंग्लज तालूक्यातील ज्या शेतक-यांच्या मुलाखती घेतल्या त्यांना शेती हा व्यवसाय तुम्ही का करता दुसरा व्यवसाय उपलब्ध नांही म्हणून? फायदेशीर धंदा आहे म्हणून हा पिढयान पिढयांचा धंदा पेशा म्हणून असा प्रश्न विचारला असता फक्त ६० टक्के शेतक-यांनी फायदेशीर धंदा आहे म्हणून शेती करतो असे उत्तर दिले कांही जनांनी दुसरा पर्याय उपलब्ध नांही म्हणून शेती करतो असे उत्तर दिले बहुसंख्य शेतक-यांनी पिढयान पिढयांचा चालत आलेला पेशा म्हणून शेती करतो असे उत्तर दिले याचाच अर्थ शेतीच्या फायदा तोटयाचे गणीत शेतक-यांच्या डोळ्यात नसते म्हणून त्यांची आर्थिक अवस्था तितकी समाधानकारक नसते.

पुढील पानावरील वर्तूळाकार आलेखा मध्ये शेतक-यांचा व्यवसायाकडे पहाण्याचा दृष्टीकोन दरवला आहे. नफ्यातोटयाचे गणीत न करता शेती करण्याचे प्रमाण किती मोठे आहे हे त्यावरून चटकन लक्षात येते.




BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

शेती हा निसर्गावलंबी जुगार आहे :-


भारतातील शेती हा निसर्ग बरोबर सर्वात मोठा जुगार आहे शेतकरी ठरल्या प्रमाणे वर्षभर घाम गाळून कष्ट करेल रात्रंदिवस राबेल सर्व गोष्टी हंगामा प्रमाणे वेळच्या वेळी पूर्ण करेल पण त्याच्या कष्टाचे फळ त्याला मिळेलच याची शाश्वती नांही. ती गोष्ट निसर्गावर अवलंबून असते. भारतातील निसर्ग हा लहरी आहे. पावसाची कोणाही शाश्वती देवू शकत नांही. केंव्हा कोठे किती पाउस पडेल कोणी सांगू शकत नांही एकदा ८-१५ दिवसात पाउसाची लहर फिरली तर शेतकरी पूर्णपणे बुडतो वर्षभर चांगला हंगाम मिळाला शेतक-याने ~~बरकर~~ काबाडकष्टाने चांगले पिक काढले आणि ऐन पोट्रीच्या वेळी मोजून फक्त ७-१५ दिवस पाउसाने पाठफिरविली की शेतक-यांची वाट लागते. त्यांच्या तोंडचे पाणी पळते भाकरीचा प्रश्न बिकट बनतो किंवा कापनी मळणीच्या वेळी सतत १५ दिवस पाउस पडू लागला तर त्याच्या सर्व कष्टावर पाणी पडेल. हाता तोंडाला आलेले पिक भुई सपाट होते आणि शेतक-यांच्या चुलीत पाणी ओतले जाते.

असा ओला किंवा सुका दुष्काळ भारतीय शेतक-यांच्या नशीबाला कायमचा चिकटलेला असतो. याची प्रचिती गडहिंग्लज तालूक्याच्या अभ्यास काळात आली. या तालूक्या मध्ये हिरण्यकेशी घाटप्रभा या दोन नद्या वाहतात. पण हा तालूका घाटमाथ्यावर येत असल्याने या नजिकच्या

अंबोली घाटात या नद्या उगम पावत असल्याने नद्यांची पात्रे लहान व प्रवाह खळखळते आहेत. पण पाणी पात्रात साठवून ठेवण्याची क्षमता या नद्या मध्ये कमी आहे. कांही बंधारे पण या नद्यांना बांधलेली आहेत पण मुळात पाणी साठविण्याची खोल पात्रे नसल्याने पाणी फारकाळ टिकत नांही तसेच ऊस सारखे खादाड पिक घेण्याची प्रवृत्ती वाढल्याने पाणी अल्पावधीत संपले जाते बिरायत पिकांना पाणी मिळत नांही देण्याच्या पद्दती व व्यवस्था नांही त्यामुळे अल्पभुधारक शेतकरी पाण्याविना आपली पिके करपलेली पहात डोळ्यात पाणी आणण्या पलीकडे कांही करू शकत नांही. मुलाखती मध्ये शेतीला नदीचे व विहीरीचे पाणी देणा-या शेतक-यांची संख्या अनुक्रमे ४० व ३२ आहे कालव्याचे पाणी कोणालाही मिळत नांही जे या पद्दतीने पाणी पाजतात ते देखील सर्व शेतीला वर्षभर गरजे प्रमाणे पाजूवू शकत नांही कारण नदीला व विहीरीला पुरेशे पाण ी मिळत नांही इतर बहुतेक शेतकरी पावसाच्या पाण्यावरच अवंलबून असतात तालुक्या मध्ये सरासरी ४०ते ४५ इंच पावूस पडतो सामान्यता हे पर्जन्यमान अगदी कमी नव्हे तरी पण पावसाची शाश्वती नसल्याने गरजेच्या वेळी पडेल किंवा नको त्यावेळी कोसळणार नांही याची शाश्वती नसल्याने नद्यांची पात्रे खोल नसल्याने उतारा मुळे नद्यांचे प्रवाह गतीमान असल्याने अभ्यास क्षेत्रातील शेतकरी समाजाला पाणी टंचाईला तोंड द्यावे लागते.

---

टिप - पुढील पानावरील आलेख पहावा


पाणी पुरवठ्यांच्या स्रोतची टक्केवारी दर्शविणारा आलेख.
1 से.मी. = 2%.
पावसाचे पाणी
नदीचे पाणी
विहिरीचे पाणी
कालव्याचे पाणी.

शेतीची पध्दत परंपरागत :-

गडहिंग्लज तालूक्या मध्ये शेतीचे तंत्र अपेक्षे प्रमाणे विकसित झालेले नांही असे आढळून आलेले आहे. शेतीसाठी सुधारलेली कारखान्यात तयार झालेली अवजारे वापरता की जुनी गावच्या कारागीराने तयार केलेली असा प्रश्न प्रत्येक शेतक-याला विचारता त्याचे उत्तर फारच थोड्या शेतक-यांनी नवीन अवजारे वापरतो असे दिले. बहुसंख्य शेतक-यांनी गावच्या कारागीरांनी तयार केलेली अवजारेच वापरतो असे उत्तर दिले रासायनीक खताच्या किंवा संकरीत बियाणा -च्या वापरा बाबतही हाच अनुभव आला. नवीन अवजारे खाते बियाणे विकत घेण्यासाठी पैसा नसल्याने परंपरेनुसारच चाललेले असते असे चर्चेतून स्पष्ट झाले याचाच अर्थ जुन्या पध्दतीने केली जाणारी शेती फायद्याची ठरत नांही नव्या सुधारलेल्या यंत्र व तंत्राचे फायदे शेती व शेतकरी यांना अपेक्षे प्रमाणे मिळत नांही व घेतले जात नांही किंवा घेता येत नांहीत.

शेतमालाच्या विक्री अवस्थेत शेतक-यांची लूट :-

जगातील कोणत्याही व्यवसाया मध्ये उत्पादक मालाच्या किंमती स्वत: ठरवितो आपण तयार केलेल्या वस्तूंची किंमत किती ठेवायची हे वस्तू निर्माण करणारा ठरवितो. त्या वस्तूंच्या निर्मीतीला आलेला खर्च विचारात घेवून व अपेक्षीत असलेला नफा गृहित धरून

कारखानदार आपल्या मालाच्या किमती ठरवितात. बाजारातील वस्तुस्थितीचा विचार करुन किमतीत थोडी चढउतार किंवा बदल होतात पण कोणत्याही परिस्थितीत उत्पादन खर्चा पेक्षा कमी किमतीने वस्तू कोणीही कारखानदार विकत नांही तसा प्रसंग आला तर वस्तूचे उत्पादन ताबडतोब घटवितात किंवा बंद करतात पण तोटा सहन करीत नांहीत. गडहिंग्लज तालुक्याच्या विक्री व्यवस्थेचा अभ्यास करीत असतांना एक अनुभव आला तो म्हणजे शेतमालाच्या किंमती उत्पादक म्हणून शेतकरी ठरवत नांहीत. तर बाजारातील अडते किंवा मध्यस्था व्यापारी ठरवितात.

या ठिकाणी बरोबर शेतक-यांच्या अडचणीचा अन् उत्पादकांच्या कडून किंवा मध्यस्थाकडून गैर फायदा घेतला जातो. शेतक-यांचा माल बाजारात येतो. सुगी संपायला एकदम उत्पादन वाढते बाजारात शेत मालाचा पुरवठा वाढतो. सहाजिक किंमती घसरु लागतात शेतमाला पैकी बराच माल नाशवंत स्वभावाचा व प्रक्रिया न केल्याने कच्चा स्वभावाचा असतो फार काळ माल साठवून ठेवण्याची व्यवस्था नसते आमच्या पहाणीत कोणत्याही शेतक-याकडे शीतगृहे किंवा सर्व सोयी नियुक्त गोडावून आढळली नांहीत. अशा अवस्थेत शेतात तयार झालेला शेतमाल सरळ बाजार पेठेत वाढू लागतो त्याची ताबडतोब विक्री करावी लागते अन्यथा व त्या पैकी बराच माल खराब होण्याची शक्यता असते. अडाणी शेतक-यांना बाजाराची माहिती

नसते त्याच्या अज्ञानाचा गैर फायदा आडते किंवा मध्यस्थ दलाल घेवून त्याला अक्षरशः लूटतात. असे अभ्यासात आढळून आले वांग्या सारख्या फळ भाज्या गडहिंग्लज बेळगांव संकेश्वर वगैरे बाजार पेठेत गेल्या वर्षी म्हणजे १९८५ साली १५ पैसे किलोने विकल्या. १५ ते २० रुपयाला पोतेभार वांगी शेतक-यांना विकावी लागली असे कांही शेतक-यांनी सांगीतले. महापूराने नदीकाटची उस व इतर पिके गेल्याने सर्व शेतक-यांनी वांगी हे कमी वेळात येणारे पिक लावले त्याचे उत्पादन अर्थातच चांगले पण एकाच पंधरवड्यात एकदम वाढले व अडत्यांनी त्याचा पुरेपूर गैर फायदा घेतला शीतगृह नांहीत मुंबई पुण्या सारख्या ठिकाणी नेवून विकण्याची कुवत व अक्कल लहान शेतक-यांना नांही त्यामुळे उत्पादनाचा खर्च तर सोडाच भरून बाजारात आणलेल्या बारदानाचा खर्च देखील निघाला नांही म्हणून डोळ्यात पाणी आणून पोटात आग घेवून परत जात असलेले अनेक शेतकरी अभ्यासकाला आढळून आले.

केवळ वांग्याचाच नव्हे तर इतर सर्वत्र शेतमालाच्या बाबतीत दलाल शेतक-यांना लुटतात त्यांच्या घामावर यांच्या गाड्या माड्या उभारल्या जातात ह्या ग्रामीण अर्थ व्यवस्थेला लागलेल्या जळवा आहेत. त्याचे हात वरखाली आणि सर्वत्र पसरलेले असतात पेठीवर बसून केवळ दिले घेतले असे व्यवहार करण्याची पोटे सुटलेली असतात तर ज्या गरीब शेतक-याच्या घामातून संपत्ती निर्माण होते त्याची पोटे खपाटीला गेलेली असतात हे दृश्य गडहिंग्लज परिसरात नित्याचे

आहे. भात मिरची तंबाखू भुईमुग कापूस भाजीपाला पिकविणाऱ्या सर्व शेतकऱ्यांना ह्या झळा पोहचतात. साखर कारखान्यामुळे उस पिकविणाऱ्या बऱ्या बागायतदारांचा अपवाद वगळला तर इतर सर्व शेतकरी या विक्री व्यवस्थेत भरडले जात असतात त्याची आर्थिक परिस्थिती सुधारत नाहीत. असे अभ्यासांती निदर्शनला आलेले आहे. शेतमालाच्या बाबतीत शेतकऱ्यांना अडचणीत आणणारी आणखी एक आवस्था म्हणजे शेतीचे उत्पादन वर्षातून एकदा सुगीला हातात येते. इतर उत्पादका प्रमाणे किंवा नोकरा प्रमाणे दररोज किंवा दरमहा उत्पन्नाचा कोणताही भाग शेतकऱ्यांना उपलब्ध नसतो त्यामुळे त्यांचा सर्व भार वर्षानंतर येणाऱ्या शेतमालावर असतो. नशीबाने हंगाम साधला तर वर्षातून एकदाच येणाऱ्या सुगीवर तो आपल्या वर्षा भरातील इतर सर्व गरजाचे गणीत मांडून बसलेला असतो. प्रसंगी पिकाच्या [illegible] आधारावर मध्यंतरी कर्ज काढण्याचे धोके पत्करलेले असतात.

## कर्ज बाजारीपणाची समस्या गंभीर आहे :-

केवळ शेत मालावर अवलंबून असलेल्या ग्रामीण शेतकऱ्यांना नैसर्गीक आणि मानव निर्मीत अडचणी मुळे आपल्या संसाराचे आर्थिक अंदाजपत्रक कधीच शिलकीचे करता येत नाही. उलट कसेही आणि केव्हाही जिकीरीने त्याने अंदाजपत्रक तयार केले तरी ते तुटीचेच ठरते तूट नेहमीचीच असल्याने त्याला कर्जाची ठिगळे लावण्याचा प्रयत्न शेतकरी करतात असे अभ्यास क्षेत्रातील परिस्थितीच्या पहाणीतून आढळून आले

कर्ज काढण्याचे प्रमुख मार्ग शेतकऱ्यांनी सांगीतले असे

(अ) सरकारी कर्ज -

शासन कांही शेतकऱ्यांना तगाईची कर्ज देते तगाई याचा अर्थ प्रतिकूल परिस्थितीत शेतकऱ्यांना तगून रहाता यावे म्हणून दिली जाणारी कर्ज दुष्काळ चोरी किंवा इतर अडचणीच्या काळात गरीब शेतकरी गावठी सावकाराच्या फासात अडकला जावू नये असा ही शासनाचा या कर्ज वाटपा मध्ये उद्देश असतो. खावटी तगाई म्हणजे दुष्काळात खाण्यासाठी दिली जाणारी तगाई असे या कर्जाचे स्वरुप असते. बैल तगाई म्हणजे बैल घेण्यासाठी दिली जाणारी तगाई असे त्या कर्जाचे स्वरुप असते.

पण बऱ्याच वेळा या सरकारी कर्जाचा दुसरीकडे वापर झालेने शेतकऱ्यांनी कबूल केले बैल न घेता मुलाचे किंवा मुलीचे लग्न धुमधडाक्याने केल्याची उदाहरणेही आढळतात. अर्थात या मुळे बुडत्याचा पाय आणखी खोलात जातो. या सरकारी कर्जाची चांगली बाजू इतकीच की त्याच्या व्याजाचा दर कमी असतो. व परतफेडीचे स्वरुप समाधानकर हप्त्याने असते. मात्र घर किंवा जमीन नसलेल्या बिगर खातेदार शेतकऱ्यांना किंवा शेतमजूरांना ही कर्ज मिळत नांहीत खुलाखातीच्या वेळी कर्ज शासनाकडून कर्ज घेणाऱ्याचे प्रमाण ५ टक्के आढळले याचाच अर्थ त्यांना गांवठी सावकारावर अवलंबून रहावे लागते असे अनेक वृध्द शेतकऱ्यानी सांगीतले.

[ब] सहकारी कर्ज :-

खाजगी सावकाराच्या कचाटातून ग्रामीण शेतकऱ्यांना सोडविण्यासाठी भारतात १९०४ साली सहकारी चळवळीचा जन्म झाला भारतात पहिला सहकारी कायदा त्या वेळी झाला तो अशा ग्रामीण शेतकऱ्यांना सहकारी तत्वावर पत पुरवठा करणाऱ्या पत संस्थांच्या संदर्भात नंतर इतर सर्व क्षेत्रातही ही चळवळ फोफावली उत्पादन व वितरणाच्या क्षेत्रातही ही आता वाढली आहे अभ्यास क्षेत्रातील सर्व खेड्या मध्ये प्राथमिक सहकारी संस्था विकास सोसायट्या [ विविध कार्यकारी सहकारी ] या नांवाने आता निघालेल्या आहेत. सहकारात पुढारलेल्या कोल्हापूर जिल्ह्याचा हा भाग असल्याने या संस्था या तालुक्यातही तुलनात्मक दृष्टया चांगले बाळसे धरुन आहेत. असे आढळले.

कोणाकडून कर्ज घेता ? या प्रश्नाला ७८ टक्के शेतकऱ्यांनी आपल्या गावच्या सोसायटीतून अशी उत्तरे दिली आहेत. पिक लागवडीच्या वेळी मशागतीसाठी खाते बि बियाणे घेण्या साठी कर्ज देतात. त्यांच्या व्याजाचे दरही माफक व ठरवून दिले दिलेले असतात. शेतकऱ्यांना सोसायटीच्या व्याजाचा दर साधारण १२ टक्के पर्यंत द्यावा लागतो. असे आढळले पण या सोसायट्यांच्या पोट नियमा प्रमाणे फक्त खातेदारांनाच म्हणजे ज्यांच्या नांवावर जमीन आहेत त्यांनाच कर्ज व्यवहार करता येतात. ते ही जमीन तारण देवून व ठराविक प्रमाणात

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

व ठराविक कारणासाठीच असे आढळते म्हणालेच शेतमजूर शेतकरी भूमीहीन बिगरखातेदार यांना सहकारी कर्ज मिळत नांहीत त्यांना कर्जासाठी इतरांच्याकडेच अवलंबून राहवे लागते.

(क) बॅन्कांची कर्जे :-

ज्या शेतकऱ्यांना जमीनीच्या विकासासाठी जादा कर्ज पाहिजे विहीरी पाईप लाईन टाकायचे असते जमीनीचे लेव्हलींग किंवा बंदीस्ती करायचे असते असे ३२ टक्के शेतकरी सहकारी बॅन्का किंवा राष्ट्रीकृत बॅन्कांच्याकडून कर्जे घेतात असे आढळते सोसायटीच्या कर्जा पेक्षा बॅन्कांच्या कर्जाचे व्याजाचे दर जास्त असतात साधारणत: १५ टक्केच्या वर व्याज दराने शेतकरी बॅन्कांची कर्जे घेत असतात असे वृध्द शेतकऱ्यांनी आपल्या मुलाखातीत कबूल केले आहेत.

बॅन्काच्या कर्जाचाही घेतलेल्या कारणासाठी उपयोग केला जातो असे नांही दैनंदीन जिवनाच्या तुटीच्या अर्थ संकल्पात बऱ्याच वेळा कर्जाची रक्कम इतर कारणासाठीच वापरली जाते त्यामुळे कर्जाची उद्दीष्टे साधाली जात नांही परत फेडीच्या वेळी अडचणी येतात व्याजवर दंड व्याज वाढत जाते . कांही वेळा कोर्ट प्रकरणे होतात व असलेली स्थावर जंगम मालमत्ता गमवावी लागल्याचीही कांही उदाहरणे आढळतात. जप्ती आणू जमीन लिलाव करण्याचा व आब्रुचे धिंडवडे काढणाऱ्या बॅन्कांच्या पेक्षा गुपचुप जमीन घानवट ठेवून घेवून पैसे


देणारा गावचे सावकार परवडला. असे कांही जनाचे मत पडले म्हणजे एनकेन प्रकारे गांवठी सावकार टिकून राहतो असेच दिसते.

[ड] गांवठी सावकाराची कर्जे :-

शासनाने कितीही प्रयत्न केला तरी ग्रामीण भागातील खासगी सावकारांच्या कचाट्यातून ग्रामीण शेतकरी सुटू शकलेला नांही अशी अवस्था आढळून आली पहाणीत खासगी सावकार पेपाहुणे यांच्याकडून कर्ज घेणा-याचे प्रमाण ५२टक्के आढळले सहकारी संस्थांच्या माध्यमातून मिळणारी कर्जे अपूरी असतात. सरकारी कर्जे पुरेशी नसतात बॅन्कांच्याकडून कर्ज मिळविण्यासाठी अनेक प्रकारचे प्रयत्न करुन अपेक्षे प्रमाणे लाभ होत नांही. कर्ज मिळविण्यासाठी ज्या गोष्टी शेतक-याना करावी लागतात त्याचे समजलेले किस्से तर भयानक आहेत. गावठी पुढारी किंवा मध्यस्थी अनेक दृष्टीने कर्ज काढू इच्छिणा-या शेतक-यांना पिळतात. शासकीय यंत्रणाही भ्रष्टाचार-पासून अलिप्त नांही. त्यामुळे कागदावर असते त्या पेक्षा फारच थोडे कर्ज पदरात पडते या सर्वाला कंटाळून गरजू शेतकरी शेवटी खासगी सावकाराच्या कर्जाकडे वळतात ग्रामीण क्षेत्रा मध्ये अशा सावकारांचा एक वर्ग तयार झालेला आहे. व्यापारी किंवा जमीनदार श्रीमंत व नव्याने निर्माण झालेल्या नोकरीच्या निमीत्याने वावरणा-या लोकांचा या गावठी सावकारांच्या मध्ये समावेश होत असतो. ग्रामसेवक शिक्षक तलाठी वगैरे

लोकांचा आता सावकारीच्या व्यवसाय करू लागले आहेत. अभ्यास पहाणी मध्ये एका हायस्कूलच्या मुख्याध्यापक सावकारी करीत असल्याचा आढळतो. सदर मुख्याध्यापक व त्याचीपत्नी त्या खेड्यात हायस्कूल मध्ये नोकरी करतात गेली २० वर्षे ते तेथेच आहेत. कोल्हापूरहून २० वर्षापूर्वी या खेड्यात आलेल्या या दोघांच्या पगारातून त्यांना खर्च फारच कमी असल्यामुळे पैसे बचत करणे व त्याची अशा कर्ज वाटपात गुंतवणूक करणे शक्य झाले ते रहात असलेले मोठे घर यांनी महिना फक्त १५ रुपये प्रमाणे भाड्याने घेतलेले आहे. मोलकरीन केवळ दोन वेळच्या पोटासाठी गेली २० वर्षे राबणारी निराधार विधवा आहे. यावरून त्यांना त्या खेड्यात खर्च किती कमी येत असावा याची कल्पना येते.

सदर शिक्षक सावकार १०० रुपयाला वर्षाला १ मण भात असे व्याज आकारतो एक मण भाताची बाजारातील किंमत २० वर्षा पूर्वी २० ते २५ रुपये होती पण आता १००-१२५ च्या दरम्यान आहे. पण पूर्वापार व्याज दरात फरक नाही गरजूवंताला अक्कल नसते. यामुळे आजही सदर शिक्षक सावकार रोकडा १०० ते १२५ टक्याने व्याज आकारतो. अडलेले नडलेले शेतकरी त्यांच्याकडून या जीव घेण्या व्याजानेही कर्ज घेतात. आपण त्यांच्या कर्जाची मुद्दल न फेडता नेमाने सुगीला


दर्शविणारा आलेख.
प्रमाण 1 से.मी. = 2%

भात घालतो असे त्या गावातील अनेक वृध्द शेतक-यांनी सांगीतले

## कर्जबाजारी पणाची कारणे

[१] लग्नासाठी कर्ज :-

अभ्यासासाठी निवडलेल्या शेतक-या पैकी जवळ जवळ सर्वच शेतकरी कोणत्या न कोणत्या स्वरूपाच्या कर्जात असल्याचे आढळले अल्पभूधारक किंवा भूमीहीन शेतमजूर शेतकरी प्रामुख्याने गावठी किंवा खासगी सावकाराकडे कर्जात असून मध्यम व मोठ्या शेतक-यांनी सहकारी संस्था बॅन्का वगैरेकडून कर्ज घेतल्याचे आढळते " कर्ज कोणत्या कारणासाठी काढलेत?" असा प्रत्येक वृध्द शेतक-याला प्रश्न विचारला गेला त्याची त्यांनी जी उत्तरे दिली त्यावरून मुलामुलींच्या लग्नासाठी कर्ज काढल्याची बोलून दाखविले लग्न हा ग्रामीण भागात अद्यापी धार्मीक प्रकार आहे. मुलामुलींची लग्ने धुमधडाक्यात झाली पाहिजेत या कल्पनेचा पगडा ग्रामीन शेतक-यांचा मनावर आहेच. आपल्या शेजा-यापेक्षा पाहूण्यापेक्षा किंवा भाऊबंदा पेक्षा आपल्या घरातील लग्न धुमधडाक्यात झाले पाहिजेत असे शेतक-यांना वाटते प्रतिष्ठा सिध्द करण्याचा तो एक मार्ग आहे. अशी समजूत असते दैनंदीन गरजा भागवून शेतीच्या उत्पन्नातून शिल्लक पडने अवघड असते अशा वेळी लग्नासाठी कर्ज काढणे अपरिहार्य ठरते हौसेला मोल नाही म्हणून लग्नाच्या वेळी कर्ज काढायला हात आवरता घेतला जात नाही

[२] सण समारंभासाठी कर्ज :-

सण समारंभ साजरे करणे हे कर्जाचे आणखी एक कारण आहे

३४ टक्के लोक यासाठी कर्ज काढतात असे आढळतात. हिंदू समाजात धार्मीक सणाचे प्रमाण सर्वात जास्त आहे. प्रत्येक सणाचे स्वरूप वेगळे खर्चाच्या बाबी वेगळ्या हे सर्व प्रतिष्ठेत साजरे करण्यासाठी कर्जाचा मार्ग अवलंबावा लागतो. प्रत्येक सणाचा धार्मीक देव देवतांची संबंध लावला गेलेला असतो. सणासाठी होणारा खर्च म्हणजे केवळ मौज नव्हे तर देवासाठी केलेला खर्च अशी श्रध्दा असते म्हणून मानूस कितीही गरीब असला तरी गणपतीच्या सणा मध्ये आरास करणारच त्यासाठी फटाके दारू सामान बाजारातून विकत घेणारच विशिष्ठ दिवशी विशिष्ठ अन्न पदार्थ करणारच गणपती आलेल्या दिवशी मोदक तर उद्रपी दिवशी मटण असणारच देवासाठी म्हणून करणार आरती म्हणतांना फटाके वाजविले नांहीतर किंवा उंद्रपीच्या दिवशी बकरे कापले नांहीतर गणपतीच्या सेवेत कमतरता येईल. त्याचा लोक किंवा नाराजी होईल. काम वाटेल ते झालेस तरी देवाच्या कामाच्या कमी पडायचे नांही अशी शेतकऱ्यांची भावना असते यातून ते कर्जाच्या कचाट्यात सापडत जातात.

यात्रा किंवा जत्रा सर्वत्र आढळणारा प्रकार गडहिंग्लज तालूक्यात महागाई या नांवाने ओळखला जातो शेतकऱ्यांनी अंदाजपत्रकात तुटीचे भार टाकायला हा आणखी एक खर्चीक प्रकार आढळून आला ग्राम देवताच्या नांवाने वर्षातील एक किंवा दोन दिवस प्रत्येक गांवी यात्रा किंवा महागाई भरते सर्व इष्ट मित्र पाहूणे त्यासाठी निमंत्रित केले जातात. शाकाहारी कुटूंबात शाकाहारी व मांसाहारी कुटूंबात मांसाहारी जेवणाच्या मेजवाण्या

हे झडत असतात २००० लोक वसतीच्या गावात त्यात एक दोन दिवसात बाहेरुन येणाऱ्याचे प्रमाण १० ते १५ हजार इतके असते याचा अर्थ ५०० ते ६०० बकरी कापली जातात. त्याच्या मिट मसाल्याच्या खर्चासाठी व बाहेरुन आलेल्या पाहुण्यासाठी सरबराई मध्ये कमी पडू नये म्हणून सर्व खर्च सढळ हाताने केला जातो. दरम्यान मद्यपान यात मर्यादा राहात नांही कपड्या लत्याची खरेदी झपाट्यांने होत असते कुटूंबाची सहा महिन्याची पोटगी या दोन तीन दिवसात संपून जाते. अभ्यास क्षेत्रातील कांही गांवची यात्रा तीन वर्षाने कांहीची ५ वर्षाने तर कांहीची दरवर्षी होते.

दरवर्षी यात्रा करावी लागणारी बड्याचीवाडी ता. गडहिंग्लज हे गांव अभ्यासक्षेत्रात येत असल्यांने शेतकऱ्यांचा अभ्यास करीत असतांना आलेला आनुभव हा बोलका आहे. गडहिंग्लज तालूक्याचे जागृत दैवत समजले जाणारे काळभैरव हे दैवत या गावच्या हद्दीत येते. त्या देवाची यात्रा दरवर्षी मोठ्या प्रमाणात भरते पाच पन्नास मैलावरुन लोक यात्रेला येतात नवसाने कापलेल्या बकऱ्यांची टेकडी तयार झालेली असते त्या दोन तीन दिवसात बड्याची वाडी गावात यात्रा असते सहाजिकच यात्रेला आलेल्या सर्व पाहुण्यांना उत्तम प्रकारचे मांसहारी जेवण व इतर जे लागेल ते देण्याची जबाबदारी जिरायत गावावर पडते या गावात कर्ज बाजारी लोकांचे प्रमाण जास्त का आढळते याचा मागोवा घेत असतांना या गावातील शेतकऱ्यांनी स्पष्टपणे सांगीतले की यात्रेमुळे दरवर्षी होणारा खर्च आम्हाला कर्ज बाजारी बनवितो देवाचा कामाला नकार देता येत नांही पण जो पर्यत हा खर्च दर वर्षी करावा लागणार तो पयंत आमचा गांव कर्जाच्या कचाट्यातून सुटणे शक्य नांही

दुस-या एका गावातील जमीनदार सावकारांची भेट झाली असतांना त्याने सांगीतलेला किस्सा ऐकूण कोणीही सर्द होईल हा सावकार गावचा पुढारी आहे. त्याच्या गांवची महागाई तीन वर्षातून एकदा होते. त्याने आपल्याकडे कर्जदार येण्यासाठी एक शक्कल लढविली एके वर्षी पाऊस लांबल्याचे निमीत्य केले आणी गांवच्या देवीला खुश करण्यासाठी असे निमीत्य करुन महागाई करण्याचा निर्णय त्यानेच घेतला व तराळाने रात्री दवंडी पेटविल्या बरोबर दुसऱ्या दिवशी पासून कर्ज मागायला त्याच्या वाड्यावर येणा-यांची संख्या वाढली दर वर्षी हे सत्र सुरु राहील्याने गावक-याचे कर्जबाजारी पणा चे प्रमाण वाढले पण सावकाराचे उखळ मात्र पांढरे झाले ही घटना सुध्दा त्या सावकरानेच संशोधकाला सांगीतली आपण किती शहाणे व गांवकरी किती मूर्ख आहेत. हे सांगण्याचे भरात त्याने गौप्य स्फोट त्याने केला

## अजारपणासाठी कर्ज :-

अजार पण हे कर्ज बाजारीचे आणखी एक महत्वाचे कारण आहे कांही जनानी यासाठी कर्ज काढल्याची कबूल केले कुटूंबातील एखादी व्यक्ती आजारी पडल्यानंतर शक्य तितक्या वेळे पर्यंत सहन करणे गांवठी औषध पाणी करणे अंगारे धुपारे करणे तंत्रमंत्र हे मार्ग ग्रामीण भागात चोहाळले जातात. कांही वेळा तर देवाचा कोप समजून धार्मीक पध्दतीने देवर्षी सांगेल त्या मार्गाने उपाय केले जातात. कोंबडी बकरी बळी दिली जातात. शेवटी डॉक्टराकडे दवापाणी करण्यासाठी खर्च केला जातो. अर्थात

हा सर्व खर्च उत्पन्नातून नव्हेतर बहुतेक वेळा कर्ज काढूनच केला जातो.

ग्रामीण शेतकऱ्यांच्या या कर्ज बाजारी पणाचे सर्वात जास्त त्यांना दुष्परिणाम त्यांना वृध्दापकाळी भोगावे लागतात. आयुष्यभर उदार उसनवार करून किंवा प्रसंगी कर्ज काढून फोडण्याची त्यांची खटपट असते. त्यांच्या हातात कारभाराची सुत्रे असतात राबण्याची अंगात कुवत असते आजचे ~~व~~ उद्या करून कर्ज फेडण्याची त्यांची धडपड असते. रात्रंदिवस राबून किंवा कष्ट करून तो कुटूंबाला गाडा ओढण्याचा कर्जाचा बोजा कमी करण्याचा प्रयत्न करीत असतो. त्याची खरी पंचायत होते ते ती वृध्दाप काळी म्हातारपणी मुले कर्ती झालेली असतात त्यांच्या हातात सर्व आर्थिक व्यवहार जातात कोणताही निर्णय वृध्द शेतकऱ्याला स्वत:च्या मता प्रमाणे घेता येत नांही. घेतला तर त्याची अंमलबजावणी मुलांच्याकडून होईलच याची खात्री नसते स्वत: एकदा निर्णय अंमलात आणण्याची कुमत शिल्लक नसते अशा वेळी त्याची आर्थिक ~~कर~~ कोंडी सुरू होते

## कर्जाचा वारसा वंशापरंपरागत :-


कर्जाचा वारसा बहुतेक~~xxxx~~ शेतकऱ्यांना त्यांच्या वडीला पासूनच मिळालेला असतो. तो कमी होणे ऐवजी त्या मध्ये भर पडण्याची च शक्यता अधिक असते तरूण पणी किंवा स्वत: कर्ते सवरते असतांना डोक्यवरच खांद्यावर करीत कर्ज फेडीत नवीन कर्ज काढत व्यवहाराचे गाडे चालले असते. पण म्हातारपणी मालकी मुला कडे गेल्याने सर्व गाडे अडते

सावकारांचा तकादा म्हाता-याचे मागे लागलेला असतो कारण त्याने ती कर्जे काढलेली असतात मात्र कर्ज फेडण्याचे कोणतेच साधन त्सांच्याकडे राहत नांही. कारण मुलगा मालक बनलेला असतो. बापाने विनाकारण कर्जाचा बोजा आपल्या डोक्यावर करुन ठेवलेला आहे. असा मुलाचा गृह झालेला असतो त्याचा आतून व सावकारांचा बाहेरुन असा तगादा लागल्याने ग्रामीण वृध्द शेतकरी दोन्ही कडून पेचात सापडतो आपली ही व्यथा कित्येक वृध्द शेतक-यांनी मुलाखातीच्या वेळी स्पष्टपणे बोलून दाखविली पहाणी मध्ये असी कांही उदाहरणे आढळली की स्वत: काबाड कष्ट करुन जमीन जुमला घेवून विहीर बागायत करुन ठेवलेल्या आई वडीलांना मुले किंवा सूण गरजे प्रमाणे वस्तू किंवा पैसा देत नांहीत किंवा देखभाल करीत नांहीत म्हाता-यांनी केलेल्या कष्टाची फळे पुढच्या पिढया चाखात असतात पण गळीत गात्र झालेल्या वृध्द व आईवाडीलांना मात्र आर्थिक दृष्टया पूर्ण परावलंबी बनवले जाते.

## निष्कर्ष :-

म्हणूनच वृध्द शेतक-यांची किंवा शेतकरी वृध्दांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी शेती व्यवसायाची पुनररचना घडून आली पाहिजे व्यापा-याकडून सावकाराकडून शेतक-यांची होणारी पिळवणूक थांबली पाहिजे बदया शेत मालकांच्याकडून शेत मजूरांची होणारी पिळवणूक थांबली पाहिजे. शासनाने केलेल्या कायद्याचे फायदे प्रत्येकाला मिळाले पाहिजेत. प्रत्येकाच्या श्रमाचे योग्य मूल्य

त्यांच्या पदरात पडले पाहिजे कामा प्रमाणे दाम मिळाले पाहिजे शेतक-यांची पर्यायाने शेतकरी वृध्दांची आर्थिक परिस्थिती सुधारावी कर्जाच्या कचाटयात ते सापडू नयेत यासाठी कांही नवीन योजना किंवा प्रकल्प राबविले गेले पाहिजेत असे संशोधकाचे मत बनले म्हणूनच प्रबंधाच्या वृध्द शेतक-यांच्यासाठी कांही योजना व प्रकल्प सुचविले आहेत· आलेखा मध्ये दाखविले प्रमाणे घर खर्च लग्न सण समारंभ अजारपण घर बांधणी विहीर खुदाई जमीन सुधारावी वगैरे साठी काढल्या जाणा-या कर्जाचे प्रमाण दाखविलेले आहे· यावरुन अभ्यास क्षेत्रातील कर्ज बाजारी पणाच्या कारणांची कल्पना येते.


वृद्धांच्या कर्जाची कारणे दाखवणाऱ्या
टक्केवारीचा आलेख.
प्रमाण 2 सेंमीटर = 2 टक्के